मंत्रालयीन सेवा
अनलिहितम सर्वदा

सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
ग्रामविकास विभाग,
बांधकाम भवन, २५- मर्झबान पथ,फोर्ट, मुंबई- ४०० ००१.
दूरध्वनी क्र. :- ०२२-२२०१३६१७ Email ID :- sofin4.rdd-mh@nic.in


क्रमांक : चौविआ- २०२१/प्र.क्र.५५/वित्त-४ दिनांक: ११ जानेवारी, २०२४

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, (सर्व)

विषय :- १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिल्लक निधी खर्च करण्याठी मुदवाढीबाबत.
संदर्भ :- समक्रमांकाचे या विभागाचे शासन परिपत्र दिनांक ०३.०७.२०२३.

महोदय/महोदया,

१४ व्या केंद्रीय वित्त आयोगाचा पाच वर्षांचा कालावधी दिनांक ३१ मार्च २०२० रोजी संपुष्टात आला आहे. परंतु कोरोनाचे संकट उद्भवल्यामुळे या साथरोगाचा प्रसार रोखण्यासाठी केंद्र शासनाच्या आदेशान्वे वेळोवेळी १४ व्या वित्त आयोगाचा शिल्लक निधी खर्च करण्याबाबत मुदवाढ देण्यात आलेली आहे.

२. तसेच संदर्भाधिन शासन परिपत्रकान्वये १४ व्या वित्त आयोगाचा शिल्लक निधी पुर्णत: खर्च करण्यासाठी दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु प्राप्त अद्ययावत माहितीनुसार काही जिल्हा परिषदांकडे अजुनही मोठ्या प्रमाणात १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाचा निधी शिल्लक (अखर्चित) असल्याचे आढळून आले आहे.

३. १४ व्या वित्त आयोगाचा शिल्लक (अखर्चित) निधी २९ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत खर्च करण्यास परवानगी याव्दारे देण्यात येत आहे. प्रस्तुत निधी पुर्णत: खर्च करुन त्याचा निरंक अहवाल शासनास सत्वर सादर करावा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदर निधी खर्च करण्यासाठी त्यांच्या स्तरावरुन आवश्यक उपाययोजना कराव्यात.

आपला,

(रा.प्र.भोईर)
उप सचिव, महराष्ट्र शासन